# माध्यमिक स्तरावर मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

– जयश्री रामराव पाटील
वरिष्ठ संशोधक विद्यार्थी,
शिक्षणशास्त्र विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**सारांश**

*प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माध्यमिक स्तरावर मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास केला आहे. पारंपरिक पद्धतीने निबंध न लिहिता या प्रतिमानाचा उपयोग करून विद्यार्थी सद्यस्थितीचे वर्णन, प्रत्यक्ष उपमा, व्यक्तिगत उपमा, विरोधाभासी शब्द, नविन प्रत्यक्ष उपमा, प्रत्यक्ष लेखन यांचा वापर करून निबंध लेखन करतात. या प्रतीमानाचा वापर जर केला तर निबंधलेखन करण्यासाठी पाठांतर किंवा घोकंपट्टी करण्याची गरज भासत नाही. त्यामुळे माध्यमिक स्तरावर मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमान परिणामकारक असल्याचे दिसून आले आहे.*

**महत्त्वाचे शब्द –** भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमान, संगणक, वृक्ष, आत्मवृत्त

**प्रस्तावना**

मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे तो समाजात राहूनच स्वतःचा विकास करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे जे शिक्षण माणूस घेत असतो. ते समाजासाठी उपयोगी असतेच तर स्वतःसाठी सुद्धा शिक्षणाचा फायदा व्यक्ती करून घेत असते. शिक्षण ही औपचारिक तसेच अनौपचारिक स्वरुपाची प्रक्रिया आहे. औपचारिक शिक्षण हे कोणत्याही शिक्षण संस्थेत प्रवेश मिळाल्यानंतर सुरु होते. तर अनौपचारिक शिक्षण घेण्यासाठी कुठल्याही शाळा महाविद्यालये यामध्ये प्रवेश घेण्याची गरज नसते. व्यक्ती समाजातून कुटुंबातून नकळतपणे शिक्षण घेत असते. औपचारिक शिक्षणात अध्ययन अध्यापन ही मुलभूत प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी शिक्षक सतत प्रयत्नशील राहतात. त्यासाठी वेगवेगळ्या पद्धती, तंत्रे, कौशल्ये, प्रतिमाने यांचा उपयोग करत असतो. अध्यापनाची परिणामकारकता जर वाढवायची असेल तर अध्यापनात नविन साधनांचा उपयोग करता आला पाहिजे. आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्या भावनिक, सामाजिक, सृजनात्मक, शैक्षणिक विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी अध्यापन प्रतिमाने उदयास आली. ही प्रतिमाने वेगवेगळ्या पायऱ्या वापरून तयार केलेली आहेत. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने मराठी विषयाच्या निबंधलेखनात भिन्नान्वयन सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून परिणामकारकता अभ्यासली आहे, निबंध लेखन अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. परंतु विद्यार्थी त्याकडे दुर्लक्ष करतात. काही वेळेला विद्यार्थ्यांच्या मनात अनेक विचार, कल्पना, बऱ्याचदा भय, संकोच, न्यूनगंड, योग्य की अयोग्य यामुळे कल्पना, भावना, संकोच, विचार व्यक्त केले जात नाहीत. कल्पना, विचार, भावना व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना वाव दिला नाही तर त्या भावना, कल्पना, विचार दडपुन टाकले जातात. यामुळे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव दिला जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे मौलिक विचार, भावना, कल्पना व्यक्त करण्यासाठी स्वातंत्र्य, मुक्त वाव देणे गरजेचे आहे. सृजनशीलतेचा विकास करण्याचे अनेक तंत्र आहेत. विल्यम गॉर्डन यांच्या सृजनशीलतेच्या उपपत्तीवर आधारित ब्रुश जॉयस यांनी विकसित केलेले भिन्नान्वान: सृजनशीलता विकास प्रतिमान याला इंग्रजीमध्ये Synectics Model असे म्हणतात. एखाद्या व्यक्तीची किंवा प्रसंगाची अगंदी भिन्न गोष्टीशी सांगड घालण्याची ही प्रक्रिया सृजनशीलतेचा अविष्कार आहे. सृजनशीलतेमुळेच मानवाची अश्मयुगापासून ते संगणक युगापर्यंत प्रगती झालेली आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

**संशोधनाची गरज**

गरज ही शोधाची जननी आहे. असे आपण सांगत असतो. गरज जेवढी तीव्र स्वरुपाची असते तेव्हढ्या आपण ती गरज पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. नविन नविन ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न केला जातो. त्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे ज्ञान जे नविन आहे ते मिळविण्यासाठी संशोधनाची गरज भासते. प्रत्येक क्षेत्रात आज मोठ्या प्रमाणावर स्पर्धा सुरु झाली आहे. दुसऱ्यापेक्षा मी वेगळा कसा ज्ञानी कसा हे दर्शविण्याच्या प्रयत्नात असतो. शिक्षण क्षेत्र त्याला अपवाद नाही. आज शिक्षणाच्या क्षेत्रात सुद्धा अमुलाग्र बदल झालेले आहेत. स्पर्धेत टिकाव लागण्यासाठी वेगवेगळ्या अध्ययन-अध्यापन पद्धतीचा अवलंब शिक्षण प्रक्रियेत केला जात आहे. त्याचबरोबर पालकांचा आपल्या पाल्याबद्दल वाढलेल्या अवास्तव अपेक्षा यामुळे आजचा विद्यार्थी हा केवळ परीक्षार्थी बनला गेला आहे. केवळ पाठांतर-घोकंपट्टी करून क्रमांक पटकावणे हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थी परीक्षेला सामोरे जातात. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये असणारे सुप्त गुण कला, कौशल्य यांचा विकास साधण्यात अडचणी निर्माण



Scanned with CamScanner

होतात. निबंध लेखनात अशा मुक्त विचार, कल्पना यांना वाव दिला जात नाही. त्यामुळे पारंपारिक पद्धतीने निबंधलेखन करून घेतले जाते. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला निबंध लेखन करताना वाव दिला जात नाही. म्हणून विद्यार्थी स्वत:चे विचार न मांडता जसा निबंध सागितला तसा लिहून काढतात किंवा पाठांतर करून लिहितात. प्रत्येक व्यक्ती ही सृजनशील असतेच. सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून विद्यार्थी निबंध लेखनात कल्पना करताना उपयोगात आणू शकतात. या तंत्रामुळे विद्यार्थी कल्पना, विचार, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष तुलना त्याचप्रमाणे व्यक्तिगत उपमा, रूपकात्मक कृती करायला शिकतात. विद्यार्थी एकाच घटकावर किंवा बार्बीवर तुलनात्मक चर्चा व विचार करू शकतात. सृजनशीलता ही जर विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनातच रुजली तर भविष्यात येणाऱ्या अडचणीवर मात करून प्रगतीच्या शिखरावर जाण्यासाठी उपयुक्त ठरेल. त्यामुळे विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

प्रत्येक व्यक्ती एकमेवाद्वितीय आहे. जगातील एकही व्यक्ती सारखी नाही. व्यक्तींमध्ये बुद्धिमत्ता, शरीराची ठेवण, व्यक्तिमत्त्व, सृजनशीलता ही वेगवेगळी दिसून येते. एखादा घटक एखाद्या व्यक्तीत अधिक प्रमाणात असेल तर तोच घटक दुसऱ्या व्यक्तीत कमी असू शकतो. व्यक्तीच्या जीवनात सृजनशीलतेला अनन्य साधारण महत्त्व आहे. सृजनशीलतेच्या विकासामुळेच मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन या उच्च स्वरूपाच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाचा वाटा आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सृजनशील विचाराना महत्त्व असल्यामुळे शिक्षणातही विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी प्रस्तुत संशोधन हे महत्त्वाचे आहे. तसेच सृजनशीलता ही विकासक्षम आहे. प्रशिक्षणाने सर्जनशीलतेत वाढ होऊ शकते. त्यामुळेच सर्जनशीलता विकासाच्या तंत्राचा उपयोग व वापर दैनंदिन अध्ययन-अध्यापनात झाला पाहिजे. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असलेली सृजनशीलता व तिचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून हे संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केलेली होती

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाची परिणामकारकता अभ्यासणे.
२. भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाची विदयार्थी व विद्यार्थिनी या गटावर होणाऱ्या परिणामकारकतेची तुलना करणे.

**परिकल्पना**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालीलप्रमाणे परिकल्पना निश्चित केलेल्या होत्या

१. मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकाच्या मध्यमानात सार्थ फरक आढळत नाही.
२. मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विदयार्थी व विद्यार्थिनी यांच्या उत्तर चाचणी गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक आढळत नाही.

**व्याप्ती आणि मर्यादा –**

**व्याप्ती**

प्रस्तुत संशोधन हे जामनेर तालुक्यातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी होते. प्रस्तुत संशोधनात मराठी विषयाच्या निबंध लेखनाचा विकास करण्यासाठी भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करण्यात आला होता. या संशोधनासाठी मराठी विषयाच्या निबंध लेखनासाठी १) मी संगणक बोलतोय!, २) एका वृक्षाचे आत्मवृत्त या दोन विषयांची निवड केली होती.

**मर्यादा**

प्रस्तुत संशोधन हे फक्त जामनेर तालुक्यातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी होते. या संशोधनात फक्त मराठी विषयाच्या निबंधलेखनाचा विकास करण्यासाठी भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचाच वापर करण्यात आला होता.तसेच निबंध लेखनासाठी १) मी संगणक बोलतोय!, २) एका वृक्षाचे आत्मवृत्त या विषयाचीच निवड केली होती.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या निबंध लेखनात भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाची परिणामकारकता अभ्यासावयाची असल्यामुळे संशोधनाच्या प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला होता.

**प्रायोगिक अभिकल्प**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने एकल गट पूर्व चाचणी उत्तर चाचणी अभिकल्पाची निवड केली होती.

**न्यादर्श**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने बहुस्तरीय न्यादर्शन पद्धतीचा वापर करून दोन शाळांची निवड केली होती. या दोन शाळांमधील एक एक तुकडी यादृच्छिक पद्धतीने निवडून त्या तुकडीमधील सर्व विद्यार्थ्यांचा न्यादर्शामध्ये समावेश केलेला होता.

**चले –**

**स्वायी चल –** भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमान

**आश्रयी चल –** पूर्व व उत्तर चाचणी मध्ये निबंधलेखनात मिळालेले गुण

**सांखिकीय परिमाणे –**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील संख्याशास्त्रीय परिमाणे वापरण्यात आली होती. ती कोष्टक स्वरुपात खालीलप्रमाणे


**कोष्टक क्र.१ निबंध एका वृक्षाचे आत्मवृत्त**



Scanned with CamScanner

**भिन्नान्वयन** – सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करण्यापूर्वी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी आणि अध्यापन करून घेतलेल्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t मूल्य.

| अ.क्र. | | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | प्राप्त t मूल्य | सार्थकता स्तर ०.०५ टेबल t मूल्य | परिकल्पनेचा त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विदयार्थी संख्या | १०० | १०० | | | परिकल्पनेचा त्याग |
| २ | मध्यमान | २.०७ | ४.३५ | १६.६६ | १.९८ | |
| ३ | प्रमाण विचलन | ०.८७ | १.०४ | | | |





**आलेख क्र. १** भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करण्यापूर्वी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी आणि अध्यापन करून घेतलेल्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t मूल्य.

**कोष्टक क्र.२ मी संगणक बोलतोय!**

**भिन्नान्वयन :** सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करण्यापूर्वी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी आणि अध्यापन करून घेतलेल्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t मूल्य.

| अन | | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | प्राप्त t मूल्य | सार्थकता स्तर ०.०५ टेबल t मूल्य | परिकल्पनेचा त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विदयार्थी संख्या | १०० | १०० | | | परिकल्पनेचा त्याग |
| २ | मध्यमान | २.१२ | ४.४८ | १५.६३ | १.९८ | |
| ३ | प्रमाण विचलन | ०.७९ | १.२८ | | | |





**आलेख क्र. २.** भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करण्यापूर्वी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी आणि अध्यापन करून घेतलेल्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t मूल्य.

**कोष्टक क्र.३ निबंध एका वृक्षाचे आत्मवृत्त**

भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विदयार्थी व विद्यार्थिनी गटाच्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान,प्रमाण विचलन आणि t मूल्य.

| अ.क्र. | | उत्तर चाचणी मुले | उत्तर चाचणी मुली | प्राप्त t मूल्य | सार्थकता स्तर ०.०५ टेबल t मूल्य | परिकल्पनेचा त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विदयार्थी संख्या | ५० | ५० | | | परिकल्पनेचा स्वीकार |
| २ | मध्यमान | ४.२२ | ४.४८ | १.२८ | १.९८ | |
| ३ | प्रमाण विचलन | १.०३ | १.०५ | | | |





**आलेख क्र. ३.** भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी गटाच्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t मूल्य.

**कोष्टक क्र.४ मी संगणक बोलतोय!**

भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी गटाच्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान,प्रमाण विचलन आणि t मूल्य.

| अन | | उत्तर चाचणी मुले | उत्तर चाचणी मुली | प्राप्त t मूल्य | सार्थकता स्तर ०.०५ टेबल t मूल्य | परिकल्पनेचा त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विदयार्थी संख्या | ५० | ५० | | | परिकल्पनेचा स्वीकार |
| २ | मध्यमान | ४.३३ | ४.६६ | १.४० | १.९८ | |
| ३ | प्रमाण विचलन | १.२४ | १.३० | | | |




**आलेख क्र. ४.** भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी गटाच्या उत्तर चाचणी गुणांकाचे मध्यमान,प्रमाण विचलन आणि t मूल्य.

**संशोधनाचे निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनाचे संख्याशास्त्रीय विश्लेषणावरून निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत

१. पूर्व चाचणी म्हणून लिहून घेतलेल्या निबंधाच्या गुणांचे मध्यमान आणि भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून मिळालेल्या निबंधाच्या गुणांचे मध्यमान यातील फरक सार्थ आहे यावरून भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमान विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या निबंध लेखनासाठी परिणामकारक

२. भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमानाचा वापर करून अध्यापन केलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी गटाच्या गुणांकाच्या मध्यमानात फारसा फरक आढळत नाही. म्हणजेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनींयांच्यासाठी भिन्नान्वयन : सृजनशीलता विकास प्रतिमान साठी विषयाच्या निबंध लेखनासाठी सारखेच परिणामकारक असल्याचे दिसून आले.



Scanned with CamScanner

संदर्भ

१) [illegible], भक्ती बि[illegible] ([illegible]), [illegible] व संशोधन, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
२) जोशी, चित्रा (२००[illegible]), अध्यापनाची प्रतिमाने, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
३) कदम, चा. प. (१९८९), शैक्षणिक संख्याशास्त्र, नूतन प्रकाशन, पुणे.
४) फडके, वासती (१९८८), अध्यापनाची प्रतिमाने, नूतन प्रकाशन, पुणे.

□ □ □



Scanned with CamScanner